Sept 2012

ISSN 2277-7644

Research Journal for
Renaissance in Intellectual Disciplines



# RENAISSANCE

Chief Editor
Dr. Khanderavaji S. Kale

International Registered and Recognized
Research Journal in Higher Education for all Subjects

Scanned by CamScanner

ISSN – 2277-7644
***International Registered & Recognized***
***Research Journal in Higher Education For all Subjects.***

# RENAISSANCE

**Research Journal For Renaissance in Intellectual Disciplines**

***Vol – II,Issue- I***
***Year –I*** ( Quarterly )
( Jully 2012 to Sept.2012 )

***Editorial Office***

***'Hira'***
1320, Laxmi Nagar.
Ganeshpur, Behind Sound
Cast Factory, Hindalga,
Belgaum. Dist- Belgaum-
591108. Karnataka (India)

***Contact :***

0831 - 2940319
08147429809
09481402640

***Email-***
khanderavaji@rediffmail.com
shakyadeeta26@gmail.com
rrr.journal@gmail.com

***WEBSITE:*** *www. rrrjournals.com*

Price Rs. 200/-

## CHIEF EDITOR

***Dr. Khanderavaji S. Kale***
'HIRA' 1320,Laxmi Nagar Ganeshpur.
Hindalga,Belgaum.[KARNATAKA]

## EDITOR

***Dr. Baumaun Prceda***
Dept of Education,
Board of Education, Bangkok.
Thailand.

***Dr. Rupesh Devan***
Dept. of Physics,
National Dong Hwa University,
Taiwan.

***Dr. Anil P. Gavali***
Dean,Faculty of Arts & Fine Arts,
Shivaji University, Kolhapr (M.S.)

***Dr. R. N. Salve***
Head, Dept of Sociology,
Shivaji University, Kolhapur,(M.S.)

***Dr. Dattatray More***
Principale
Shri. Shahaji Chh. College,Kolhpur.

***Dr. Vilas Kharat***
Dept. of Mathematics,
Pune University, Pune.(M.S.)

## CO - EDITOR

***Dr. Ramchandra Nilpankar***
Head, Dept. of Commerce,
Ajara College,
Ajara, Dist. Kolhapur.

***Appasaheb Kamble***
Dept. of History,
R.B. Madkholkar College,
Chandgad, Dist. Kolhapur.

***Dr. Deepak Kamble***
Head, Dept. of Geography,
Vivekanand College,
Kolhapur, Dist. Kolhapur.

***Ajaykumar Kamble***
Head, Dept. of Hindi,
Art's & Commerce College,
Kowad, Dist. Kolhapur.

***Dr. Arun Kumbhar***
Head, Dept. of Economics,
Art's & Commerce College,
Nesri, Dist. Kolhapur.

***Hanumant Kuchekar***
Dept. of Political Science,
Art's & Commerce College,
Nesri, Dist. Kolhapur.

***Dr. Vishnu Patil***
Head, Dept. of History,
Art's & Commerce College,
Kowad, Dist. Kolhapur.

***Jyant Ghadge***
Head, Dept. of Sociology,
Dr. B.R. Ambedkar College,
Pethwadgaon, Dist. Kolhapur.

***Dr. Ranjna Suryawanshi***
Dept. of Hindi,
R.B. Madkholkar College,
Chandgad, Dist. Kolhapur.

***Vasant Kadam***
Head, Dept. of Sociology,
Vivekanad College,
Kolhapur, Dist. Kolhapur.

Scanned by CamScanner

## CONTENTS

1. **N. V. Shaha**
Prospects of Tourism Development In Maharashtra: A Segment Approach

6. **Mahendra k. Chavan**
Psychological Wellbeing of Pensioner and Non-Pensioners.

11. **S. T. Naik**
Financial Position of Agricultural Producing Marketing Committee, Gadhinglaj.

14. **Mangalkumar R. Patil**
Theme of Love, Revenge and Sacrifice in Khushwant Singh's Train to Pakistan

19. **V. A. Mane**
Emerging Trend of E-Commerce in India.

27. **Madhavi Vijay Charankar**
Impact of GLP on of Life Insurance Industry In India.

33. **R. N. Salve**
Socio-Cultural life of Scheduled Castes: A Sociological Study

37. **Goral Sonappa D.**
Commercial Banks' Role in Rural Development

42. **V. H. Awaghade**
Role of E-Banking in Rural Area.

52. **R. B. Teli**
Changing Perspectives In Service Tax In India

59. **भारती विजयराव शेळके**
पंख और पतवार काव्यसंग्रह का समीक्षात्मक विवेचन (केदारनाथ अग्रवाल)

Scanned by CamScanner

63. माधवी शिवाजीराव जाधव
जयप्रकाश कर्दम के काव्य में दलित-विमर्श

68. अजयकुमार कृष्णा कांबळे
भारत की पत्रकारिता में हिन्दी की वास्तविकता

71. सुभाष ग.जाधव
मराठी ग्रामीण नाटक : संकल्पना आणि स्वरूप

77. विजया साखरे
मुखेड येथील प्राचीन शिवमंदिर

80. विजया साखरे
माहुर लेणी

88. अनिल कठारे
हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात कंधारचा सहभाग

93. अनिल कठारे
निजामकाळातील मराठवाड्यातील महार लोकांची खाजगी कामे

96. मंजूश्री शिवाजीराव घोरपडे
चालुक्यकालीन सांस्कृतीक जीवनाचा अभ्यास

101. खंडू संभाजी काळे
विवाह विच्छेदः कारणे आणि उपाय

106. कुचेकर एच्. एस.
राजकीय नेतृत्वाचे बदलते स्वरुप : एक दृष्टिक्षेप

111. मासाळ एन.एस. & आजगेकर बी.ए.
कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुक्यातील पर्यटन उद्योग - एक भौगोलिक अभ्यास

118. आर. डी. कांबळे
स्त्री नाटककारांच्या नाटकातील जीवन जाणिवा
(संदर्भः प्रारंभ ते १९५० पर्यंत)

126. शिवाजीराव पाटील
हादगा गीतातील पारंपारिक स्त्री प्रतिमा आणि बदलते सामाजिक संदर्भ

Scanned by CamScanner

*RESEARCH PAPER--MARATHI*
Research Journal For
Renaissance In Intellectual Disciplines
ISSN 2277-7644,Vol-II, Issue-I, Jully-2012

# मराठी ग्रामीण नाटक : संकल्पना आणि स्वरूप

सुभाष ग.जाधव
मराठी विभाग,
दत्ताजीराव कदम कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी, जि.कोल्हापूर .

मराठी वाङ्मयामध्ये विविध प्रवाह निर्माण झाले आहेत. त्या साहित्य प्रवाहाला अनुसरून साहित्याचा आढावा घेताना विविध प्रवाहनिर्मितीच्या माघची कारणमीमांसा पहावी लागते. पूर्वीच्या काळात उच्चभ्रू वर्गातील लोक साहित्य लिहीत होते. त्यांना सर्वसामान्य जनतेच्या भाव-भावना, सुख-दु:खे या गोष्टीशी काहीही देणे-घेणे नव्हते. त्यामुळे त्यांचेच जीवन त्या साहित्यातून येत असत, तसेच उच्चभ्रू वर्गातील लोक सामान्य जनतेचे शोषण करीत असे. मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज यांच्या प्रयत्नाने शिक्षणाचा प्रसार झाला आणि पहिली पिढी विचारास प्रवृत्ती झाली. त्यांची अस्मिता शिक्षणामुळे जागी झाली. आपणच आपल्या व्यथा-वेदनांना शब्दबध्द केले पाहिजे हे त्यांना समजले. त्यामुळे त्यांनी लेखनी हाती घेतली आणि साहित्य निर्मितीस सुरूवात झाली.

मराठी साहित्य निर्मितीचा विचार करता विविध प्रवाह निर्माण झालेले दिसतात. उदा.ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी अशा अनेक साहित्याच्या प्रवाहांचा समावेश मराठी वाङ्मयात झालेला दिसतो. येथे प्रामुख्याने आपणास ग्रामीण साहित्याच्या अनुषंगाने विचार करावयाचा असल्याने आपणास महात्मा फुले यांच्या साहित्याकडे पहावे लागते. महात्मा फुलेंनी स्वतंत्रपूर्व काळात ग्रामीण जीवनाचे चित्रण करायला सुरूवात केली. त्या काळात ग्रामीण ही संज्ञा/संकल्पना जरी रूढ नसली तरी ती साहित्यनिर्मिती ग्रामीण साहित्यामध्ये येणारी आहे. हे विविध अंगांनी पाहिल्यास दिसते. एकूणच ग्रामीण साहित्याची बीजेही महात्मा फुलेंच्या साहित्यात दिसून येतात. आपला देश खेडयांचा देश असल्याने तेथील जनजीवन शहरीभागापेक्षा वेगळे असते. या भागातील लोकांची आर्थिक, मानसिक, सामाजिक पिळवणूक होते. हे महात्मा फुलेंच्या लक्षात आले. याचे चित्रण त्यांनी घ्शेतकऱ्यांचा असूड या ग्रंथातून केले आहे. साहित्यातून शेतकऱ्यांचे दयनीय स्थितीचे दर्शन प्रथम येथे घडले. नंतरच्या काळात शेतकऱ्यांच्या जीवनाची समाजाला ओळख होऊ लागली. ग्रामीण साहित्याचा उदय मात्र स्वातंत्रोत्तर काळात झालेला दिसतो. जी भाषा अडाणी, गांवढळ समजली जात होती, तिच भाषा साहित्याची भाषा म्हणून समाजात रूढ झाली. परिणामी ग्रामीण साहित्याच्या लेखनाला चालना मिळाली.

स्वातंत्रोत्तर काळात ग्रामीण साहित्याचे लेखन अधिक प्रमाणात लिहिले गेले. यामध्ये कथा, कादंबरी, काव्य, नाटक इ. प्रकारांचा समावेश झालेला दिसतो. या लेखनातून ग्रामीण साहित्याचा विकास झाला. यातून ग्रामीण भागातील विविध पातळीवरील समस्या मांडल्या गेल्या. कथा, कादंबरी व काव्य या वाङ्मय प्रकारचा अभ्यास ग्रामीण कथा, ग्रामीण कादंबरी व ग्रामीण कविता या शिर्षकाखाली केला जाऊ लागला. मात्र ग्रामीण नाटक म्हणून अजूनही अभ्यास केला जात नाही. या अनुषंगाने येथे ग्रामीण नाटकांचा विचार करावयाचा आहे.



Scanned by CamScanner

म्हणजेच ग्रामीण नाटकांची संज्ञा/संकल्पना आणि स्वरूप थोडक्यात येथे पहावयाचे आहे.

ग्रामीण नाटकाची संज्ञा/संकल्पना स्पष्ट करताना प्रथमता आपणास नाटक वाङ्मयाच्या व्याख्याचाविचार करावा लागेल. त्यानंतर सामाजिक नाटक पहावे लागेल व नंतर ग्रामीण नाटकाची व्याख्या पहावी लागेल. कारण नाटक हा वाङ्मय प्रकार इतर वाङ्मय प्रकारापेक्षा वेगळा आहे. यातील मुख्य फरक म्हणजे नाटक हा दृक्श्राव्य वाङ्मय प्रकार आहे. तो पहाताही येतो आणि ऐकताही येतो. नाटक हा वाङ्मय प्रकार कसा निर्माण झाला याविषयी अनेक अख्यायिका सांगितल्या जातात. नट हा संस्कृत शब्द मूळचा प्राकृतीतील आहे. नर्त(म्हणजे नाचणे) या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश होऊन तो प्राकृतात आला. याच्या मूळ अर्थाचा विचार करतां नाटक या शब्दाचा अर्थ नाचणे असाच आहे. नट म्हणजे नाचणे अभिनय करणे असा अर्थ मराठी विश्वकोषात दिला आहे. त्यावरून नाटक म्हणजे नाटयरुपाने सोंगाच्या रूपाने दाखविणे असा अर्थ रूढ झाला. इंग्रजीतील ड्रामा हा मूळ ग्रीक ड्रन (Dran) या शब्दावरुन आलेला आहे. याचा अर्थ कृती करणे असा आहे. नाटकाची व्याख्या करणे तसे अवघडच आहे. असे असले तरी काही अभ्यासकांनी नाटकाच्या व्याख्या मांडल्या. या व्याख्यातील मराठी विश्वकोषातील व्याख्या पुढीलप्रमाणे दिसते.

नाटक म्हणजे माणसाच्या अंतर्बाह्य क्रिया-प्रतिक्रियांचे दर्शन घडविणारा आकृतिबंध होय.[१] या व्याख्येत माणसाच्या क्रिया-प्रतिक्रियांना महत्त्व देऊन व्याख्या मांडलेली दिसते. पुढे मात्र प्रसंग, संवाद यांना महत्त्व दिलेले दिसते.

नाटक म्हणजे प्रसंग आणि संवाद यांच्याद्वारा व्यक्त होणारा संघर्षमय कथात्म अनुभव असे म्हणता येईल.[२]

अशा व्याख्या विश्वकोषात दिसतात. महाराष्ट्र शब्दकोषामध्ये घ्नाटकङ या शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे दिसतो.- नाटक-सोंग घेऊन करण्याचा खेळ, एखादी गोष्ट (ऐतिहासिक, कल्पिक किंवा पौराणिक अनेक स्त्री-पुरुष पात्रांकडून प्रत्यक्ष घडल्याप्रमाणे करून दाखविणे; नाटयरूपक दशरूप लक्षणातील दहा प्रकरणातील नाटक हा पहिला प्रकार आहे.[३]

मराठी विश्वकोष व महाराष्ट्र शब्दकोष या दोन्ही ठिकाणी दिलेल्या व्याख्यामध्ये खेळ, सोंग अभिनयाला व माणसाच्या अंतर्बाह्य क्रिया-प्रतिक्रियांना महत्त्व दिलेले दिसते. मात्र नाटक हे कसे निर्माण झाले. याविषयीची एक अख्यायिका सांगितली जाते. या अख्यायिकेमध्ये असे म्हणतात की-स्वर्गनिवासी लोकांच्या विनंतीवरुन सर्व वर्णाच्या लोकांना एकत्र बसून आस्वाद घेता येईल, असा नाटयवेध म्हणजे पाचवा वेद ब्रह्मदेवाने तयार केला. हा वेद तयार करताना ऋग्वेदातून पाठय, यजुर्वेदातुन अभिनय, सामवेदातून गीत व अथर्व वेदातून विविध रस घेऊन हा पाचवा वेद म्हणजे नाटयवेध सिध्द केला.[४]

वरील अख्यायिकेचा विचार करता चार वेदातून संवाद, अभिनय, संगीत आणि रस हे चार घटक घेऊन देवाने पाचवा वेद मनोरंजनासाठी निर्माण केला. भरताच्या मताचा विचार करता नाटक दृश्य आणि श्राव्य काव्य प्रकार आहे. नाटकाविषयी भरत म्हणतो.

विविध भावांनी संपन्न आणि विविध प्रसंगांनी युक्त असलेल्या लोकवृत्तीची जगातील लोकांच्या आचारविचारांची अनुकृती म्हणजे नाटक; नाटक म्हणजे भावानुकीर्तन, नाटक म्हणजे जीवनाचे दर्शन घडविणारा आरसा[५] नाटय म्हणजे काय तर भावनांचे अनुकृत स्वरूप होय. म्हणून भरतमुनी भावानुकीर्तन याला महत्त्वा देतात. कृष्णाजी शिंदे नाटक शास्त्र आणि तंत्र या ग्रंथात नाटकाची व्याख्या मांडताना म्हणतात-नाटक म्हणजे कथानक, पात्रे, अभिनय आणि क्रिया या चार गोष्टींचा चौकोनात सौंदर्याचा अविष्कार करुन तयार केलेली आनंद देणारी, वाङ्मयकृती होय.[६] येथे कृष्णाजींनी कथानक, पात्रे अभिनय आणि क्रिया या गोष्टींना महत्तव देतात. गोपाळ वामन बापट यांनी नाटकाचे स्वरूप स्पष्ट करणारी व्याख्या मांडली. त्यांच्या मते- नाटक हे काल्पनिक अथवा खरोखर होऊन गेलेल्या एखाद्या व्यक्तीच्या व तिच्या संबंधीत असलेल्या इतर व्यक्तींच्या आयुर्वृत्तांतील काही भागाचे दृश्य रूपाने मर्यादीत काळात दाखविलेले व मनोरंजन करुन उपदेश करणारे दृश्य काव्य आहे.[७]

येथे बापट यांनी माणासाच्या आयुष्यातील घटनादृश्यांना महत्त्वा दिले आहे. मराठी वाङ्मयात कादंबरी लेखन करणारे व ज्यांच्या नावाने वाङ्मयीन कालखंड ओळखला जातो ते म्हणजे प्रा.ना.सी.फडके होत. फडके नाटकाविषयी मत मांडताना म्हणतात-रंगभूमीवर नटाकडून अभिनयाच्या व भाषणाच्याद्वारे लोकसमुदायास सांगितलेली कथा



Scanned by CamScanner

म्हणजे नाटक.' येथे फडके अभिनय आणि भाषण म्हणजेच कथानक याला महत्त्व देताना दिसतात.

वरील नाटकाविषयीच्या व्याख्याशिवाय इतरही अनेक मराठी, पाश्चात्य अभ्यासकांनी व्याख्या मांडल्या आहेत.उदा- अभिनव गुप्त, कालिदास, अ.वा.कुलकर्णी, प्रा.भालबा केळकर, पु.ल.देशपांडे, वसंत कानेटकर, फ्रेंच विवेचक क्रमेतिए, अॅंडरडाईस, निकल, अॅरिस्टॉटल ग्रीक विचारवंत, सिसिरों इत्यादी अशा अनेक अभ्यासकांनी आपापल्या परिने नाटकाची व्याख्या मांडली आहे. या सर्व व्याख्यावरुन आपणास साधारणपणे नाटक म्हणजे काय? याची व्याख्या मांडताना असे म्हणता येईल की,

नाटक या साहित्य प्रकारामध्ये कलेला महत्त्व आहे. या कलेला अनुसरून एखादा कथात्मक भाग प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी संघर्षमय प्रसंगानुरूप संवादाद्धारे विविध पात्रे अभिनयाच्या माध्यमातून माणसाच्या जीवनाचे विविध पैलू रंगभूमीवर हुबेहूब सादरीकरण करतात. त्या कथावस्तूस नाटक असे म्हणता येते.

वरील व्याख्येत नाटक या वाङ्मयात जे घटक महत्त्वाचे असतात. त्या सर्व घटकांचा समावेश झालेला आहे. म्हणजे नाटक ही कला आहे. त्यात कथानक आहे. या कथानकात संघर्षमय प्रसंग येतात. ते प्रसंग अनेक संवादाद्धारे विविध पात्रांच्या माध्यमातून येताना दिसतात आणि यातूनच माणसाच्या जीवनातील विविध पैलूंचे दर्शन रंगभूमीवर होते. या व्याख्येनंतर येथे सामाजिक नाटकाची डॉ.प्रकाश मेदरकर यांनी मांडलेली व्याख्या महत्त्वाची आहे. ती अशी- विशिष्ट सामाजिक वास्तव व ज्या वास्तवातून जन्मलेली सामाजिक समस्या यांचे चित्रण करणारे नाटक म्हणजे सामाजिक नाटक होय.[९] नाटक या वाङ्मयाच्या अभ्यासात सामाजिक नाटक या शिर्षकाखाली अनेक नाटकांचा अभ्यास करावा लागतो. कारण त्या नाटकाच्या कथावस्तू या समाजात घडणाऱ्या वास्तव घटनातून निर्माण झालेल्या दिसतात. याचा विचार केल्यास आपणास ग्रामीण नाटकाविषयी मत मांडता येते. येथे जसे सामाजिक नाटकात वास्तवाला प्राधान्य दिले आहे. तसे ग्रामीण नाटकात ग्राम संज्ञेला महत्त्व दिले आहे. ग्राम संज्ञेशी संबंधीत वास्तव घटनांचा विचार करावा लागतो. म्हणून येथे ग्रामीण नाटकाची व्याख्या मांडताना असे म्हणता येते की-

ग्रामीण नाटकात कलेला अनुसरून प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी ग्रामीण भागातील घ्यामङ संकल्पनेशी निगडीत असणाऱ्या वास्तव घटनातून ग्रामीण समस्या मांडल्या जाता. ज्यामध्ये कथानक, पात्रे, संवाद, वातावरण प्रसंगचित्रण, भाषाशैली या सर्वांचा समावेश ग्रामीण संस्कृतीशी व जीवनाशी निगडीत असतो. अशा नाटकास ग्रामीण नाटक म्हणतात. इतर नाटक वाङ्मयातून चित्रीत होणाऱ्या आणि ग्रामीण नाटकातून चित्रीत होणाऱ्या समस्या या भिन्न असतात. नागरी जीवन आणि ग्रामीण जीवन यामध्ये खूपच फरक असतो. त्यामुळे ग्रामीण भागातील समस्यांचे चित्रण ग्रामीण नाटकातून करणे इष्ट ठरते. म्हणून ग्रामीण नाटक हा नाटक वाङ्मयातील एक उपप्रकार मानावा लागतो. ग्रामीण नाटकातून मांडलेला आशय येणाऱ्या व्यक्तिरेखा वातावरण निर्मिती, संवाद व भाषाशैली या सर्व घटकांचा संबंध ग्रामीणतेशी असतो. तो कोणत्याही प्रकाराने आपणास टाळता येत नाही. ग्रामीण समस्या मांडताना ग्रामीण भागातील रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, सण-सोहळे, जत्रा-यात्रा इत्यादी या सर्व घटकांचा परिणाम होत असतो. त्यामुळे ग्रामीण नाटकाची मांडलेली व्याख्याही ग्रामीण पातळीवर तपासल्यास योग्य असल्याची खात्री पटते. मराठीतील ग्रामीण नाटकाची व्याख्या/संकल्पना मांडल्यानंतर ग्रामीण नाटकाचे थोडक्यात स्वरूप पहाणे योग्य ठरते. कारण ग्रामीण नाटक लिहिले जाते का? असा एक प्रश्न मराठी साहित्यीकांच्या चर्चेत असतो. त्यादृष्टीने मराठी ग्रामीण नाटकाचे स्वरुप मांडताना प्रथमता आपणास महात्मा फुलेंचे तृतीयरत्न या नाटकाचा विचार करावा लागतो. महात्मा फुलेंनी हे नाटक इ.स.१९७९ रोजी पुरोगामी सत्यशोधक या त्रैमासिकातून एप्रिल-जूनच्या अंकात प्रसिध्द झाले. हे नाटक १८५३ साली लिहिले आणि इ.स.१८५५ साली दक्षिणाप्राईज कमिटीसमोर सादर केले. प्रथमता हे नाटक हिंदीतून रंगभूमीवर सादर झाले आणि नंतरच्या काळात ते मराठीतून प्रसिध्द झाले. या काळात इंग्रजांचे राज्य होते आणि भारतात शिक्षणाचा प्रसार झालेला नव्हता. परिणामी उच्चवर्णीय समाज हा अशिक्षित समाजाची कशी आर्थिक, मानसिक पिळवणूक करतो, त्याला कर्जात कसा बुडवतो. याचे सामाजिक पातळीवरील चित्रण फुलेंनी या नाटकातून केले आहे. या नाटकाविषयी प्रा.दत्ता भगत आपले मत व्यक्त करताना म्हणतात-आज तृतीयरत्न हे मराठी भाषेतील पहिले सामाजिक नाटक म्हणून मान्यता पावले आहे. हे केवळ पहिले सामाजिक नाटक नसून मराठीतले पहिले आधुनिक नाटक आहे. अशीही विधाने अलिकडे केल जातात.[१०] या विधानाची यथार्थता नाटक वाचल्यानंतर वाचकांना होते. हे नाटक जसे मराठीतील पहिले आधुनिक नाटक आहे



Scanned by CamScanner

तसेच ते ग्रामीण आशयासूत्र व पार्श्वभूमीवर मांडलेले ते मराठीतील पहिले ग्रामीण नाटक आहे. तृतीयरत्न या नाटकाच्या शिर्षकातच फुलेंनी तृतीय म्हणजे तिसरा आणि रत्न म्हणजे सोन्यातीलप्रकार किंवा सर्वापेक्षा वेगळा ठरणारा किंवा डोळा होय. शंकराला राग आल्यानंतर तो तांडवनृत्य करुन तिसरा डोळा उघडतो.तसेच महात्मा फुलेंनी समाजातील गुलामगिरी, अज्ञान, लुबाडणूक, फसवेगिरी पाहून फार मन:स्ताप झाला आणि याला वाचा फोडण्यासाठी ज्ञानाचा म्हणजेच शिक्षणाचा तिसरा डोळा उघडण्यासाठी स्वत: प्रयत्न केला. शिक्षणाचे महत्त्व त्यांना समजलेले होते म्हणून त्यांनी समाजात जागृती निर्माण करायची असेल, समाजात प्रगती घडवून आणायची असेलं, विकास करावयाचा असेल तर प्रथमं तळागाळातील लोकांनी शिकले पाहिजे, असे त्यांना वाटू लागले. यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केले.

तृतीयरत्न हे ग्रामीण पातळीवर मांडलेले नाटक असल्याने या नाटकास ग्रामीण नाटकाचा पहिला मान जातो. कारण खेडेगावातील एका अशिक्षित माणसाच्या जीवनाचे दर्शन येथे घडते. एकंदरीत या नाटकातून महात्मा फुलेंनी शिक्षणाचे महत्त्व, कर्जबाजारिपणा, अंधश्रध्दा, लुबाडणूक इ. अशा अनेक अंगांनी विचार करुन समाजातील गोष्टीवर प्रकाश टाकला आहे. इतकेच नव्हे तर शिक्षण हाच समाजाचा तिसरा डोळा आहे. हे त्यांनी पटवून दिले आहे. दत्ता भगत यांनी वर मांडलेल्या मताचा परामर्श घेता यासंदर्भात डॉ.सतिश पावडे यांचे मत महत्त्वाचे ठरते. ते या नाटकाविषयी म्हणतात-तृतीयरत्न हे नाटक सर्वच दृष्टीने खरे मराठी नाटक असून तेच मराठी रंगभूमीवरील आद्य नाटक आहे आणि त्याचे लेखक ज्योतीराव फुले हेच मराठी रंगभूमीचे खरे जनक आहेत.''[११]

या विधानावरुन घ्तृतीयरत्नङ या नाटकाला मराठी ग्रामीण नाटकाचा पहिलेपणाचा मान जातो यात शंका नाही आणि मराठी रंगभूमीचे जनकत्व हे महात्मा फुलेंनाच द्यावे लागते हे ही सत्य आहे.

तृतीयरत्न या नाटकातून एका अशिक्षित कुटूंबातील नवरा-बायकोला एक ब्राम्हण त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन कसा लुटतो आणि आपली पोटाची खळगी कसा भरतो याचे उत्तम चित्रण करुन वाचकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे. समाजात शिक्षणाचा प्रसार नसल्याने असे अनेक नवरा-बायको अंधश्रध्देला बळी पडतात. या नवरा-बायकोच्या पोटी जन्माला येणाऱ्या मुलांवर शनिचा प्रभाव आहे आणि या भटावरही शनिचा प्रभाव आहे. मात्र या शनिचा वाईट परिणाम फक्त जन्माला येणाऱ्या मुलावरच होतो आणि भटावर मात्र काहीच वाईट परिणाम होत नाही. हे या अशिक्षितांच्या लक्षात येत नाही. हा मुख्य आशय या नाटकातून येतो. विदूषक या अशिक्षित लोकांना समजावण्यासाठी येतो. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन तो भट आपल्या पाहुण्यांसाठी जेवणावळ घालण्यास सांगतो. वरुन दक्षिणाही घेतो. याठिकाणी तो भट स्वत:चा स्वार्थ साधून घेतो. आपल्या पाहुण्यांचा फायदा करुन घेतो. या जेवणाने भट आनंदी होतो. पण ते नवरा-बायको कर्जाच्या डोंगराखाली गाडले जातात. त्यांना कर्ज फेडण्यासाठी अनेक वर्षे काम करावे लागणारे असते. तरीही ते फिटणारे नसते. आपल्या मुलांना काहीही होऊ नये असे प्रत्येक आई-वडिलांना वाटत असते. पण ते जर अशिक्षित असतील तर यासारखे अंधश्रध्देने लोक कर्जबाजारी होतात. त्यामुळे त्यांची अधोगती होण्यास सुरुवात होते. हा वास्तव प्रश्न या आशयात फुलेंनी मांडून त्या काळात लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालून सामाजिक प्रश्न मांडला आहे. या वास्तवरुपी कथानकाविषयी डॉ.मदन कुलकर्णी म्हणतात-एकंदरीत कथानक दृष्टया विचार केला आणि तंत्राचा विचार बाजूला सारला तर जोतिबांना जे जळजळीत वास्तव लोकांसमोर मांडावयाचे होते, त्यात ते यशस्वी झालेले दिसतात.''[१२] या विधानावरुन हे स्पष्ट होते की समाजात शिक्षणाचा प्रश्न मांडण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी फुलेंनी ग्रामीण नाटकाच्या अनुषंगाने केलेला प्रयत्न योग्य आहे आणि त्यात ते यशस्वी झाले आहेत. मा.फुलेंच्यानंतर मो.ग.रांगणेकरांनी वहिनी या ग्रामीण नाटकातून सामाजिक पातळीवरील कौटुंबिक आशय मांडला आहे. आणीबाणीच्या वेळी घराण्याची इज्जत राखण्यासाठी घरातील एक स्त्री (वहिनी) पुढाकर घेते आणि ती घराचे घरपण राखण्यात यशस्वी होते. जानकीचा दीर हा एका मुलीशी प्रेम करतो. यातून त्यांचे शरीर संबंध येतात. यामुळे दोघांच्या लग्नाचा विषय समोर येतो. जातीयता, उच्च-निचता निर्माण होते कारण ती मुलगी ब्राम्हण असते तर वल्लभ हा इनामदार असतो. यातून अनेक मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र शेवटी जानकी वल्लभचं खरं प्रेम जाणून घेऊन जन्माला येणाऱ्या मुलास वल्लभला स्वीकारण्यास सांगून लग्नास परवानगी देते. याठिकाणी ती इनामदार घराण्याची इज्जत राखते आणि कुटूंबात होणारा कलह थांबवण्यात यशस्वी होते. हे ग्रामीण पातळीवर रांगणेकारांनी रेखाटले आहे. र.वा.दिघेंनी माझा सबुद या नाटकातून रामोशी जातीचा प्रकर्षाने उल्लेख केला आहे. एक क्रांतीकारी रामोशी



Scanned by CamScanner

नंतरच्या काळात शेतकरी होतो आणि क्रांतीकारकांना देश स्वातंत्र्यासाठी दिलेला शब्द पाळतो. रामोशी एकदा शब्द दिल्यानंतर तो कोणत्याही परिस्थितीत बदलत नाही. याचे चित्रण येथे होते. प्रसंगी तो आपली जीभ कापून घेताना दिसतो. ला.कृ.आयरेंनी अनेक ग्रामीण नाटके लिहिले. दोन भावांच्यामध्ये गैरसमजातून फूट पडते आणि जमिनीसाठी एकमेकांच्यावर फिर्याद कशी नोंदवली जाते व ते दोघेही कसे रसातळाला जाता. याचे चित्रण ग्रामीण पातळीवर दिसून येते. शेतकरी दादा मध्ये एका प्रामाणिक शेतकऱ्याची कर्मकहाणी येते. कुलकलंक मध्ये घरावर मुलाने खून करुन लावलेला कलंक कसा घालवायचा या विचारातच नाटकाचा शेवट होतो आणि यातील नायक विश्वास शेवटी आत्महत्या करतो. मायमाऊली मध्ये जयवंती ध्येयवादी असल्याने ती अनेक वाईट प्रसंग, संकटे येऊनही ती ध्येयपुर्तीसाठी ते सहन करुन मुलाला (जयवंत) डॉक्टर बनविते. बुध्दिभेद मध्ये ९२ कुळी मराठा आणि ९६ कुळी मराठा हा जातीयवादी संघर्ष लग्नाच्या निमित्ताने निर्माण होतो. ही सर्व नाटके ग्रामीण पातळीवर साकारतात.

भा.वि.वरेकरांनी जिवाशिवाची भेट व दौलतजादा अशी ग्रामीण पातळीवरील नाटके लिहिले. दोन भावामध्ये पडलेली फूट आणि गैरसमज दूर होताच त्यांचे एकत्र येणे हे जिवाशिवाची भेटमध्ये मांडलेले दिसते. तर दौलत जादा मध्ये अनेक श्रीमंत पात्रे येतात. पण गौरीच्या कलेची दाद खऱ्या अर्थाने तमाशात मिळते आणि उभ्या आयुष्यात बापू मांगाने पाहिलेली नसते. एवढी दौलत गौरीच्या नाचावर लोकांनी उधळलेली त्याला पहावयास मिळते.

ग्रामीण भागातील संक्रांतीचे औचित्य साधून रक्ताची नाती कशी असतात याचे चित्रण रक्ताची नाती मध्ये म.भा.भोसलेंनी केले. पुढे त्यांनी पतीचा खून व लाडकी लेक ही (२) दोन ग्रामीण नाटके लिहिली. पतीच्या बाहयरखेली पणामुळे एक सुसंस्कृत स्त्री पतीच्या खुनापर्यंत कशी विचार प्रवृत्त होते. याचे चित्रण येते तर गावातील सर्व मुला-मुलींची लग्न जुळवणारा आबा स्वत:च्या मुलीच्या सुखासाठी गावाचा विरोध पत्करतो असे विविध पातळीवरील आशय भोसलेंनी मांडले आहेत. नामदेव व्हटकर यांनी जातीयतेला मुख्य केंद्रस्थानी ठेवून डाग व व्हाट चुकलीड ही नाटके लिहिली. जातीयता नष्ट करण्यासाठी कशा पध्दतीने प्रयत्न केले पाहिजेत याचे चित्रण व्हाट चुकलीड मध्ये दिसते.तर एका तमाशातील स्त्रीच्या चारित्र्यावर लागलेला डाग कसा लागतो व तो तिला पुसता येत नाही याचे चित्रण करुन तमाशा कलेवर प्रकाश टाकला आहे. आण्णाभाऊ साठेंनी ग्रामीण भागातील इनामदार कसा गोरगरिबांना छळतो त्यांच्यावर असा अन्याय करतो व तो शेवटी कसा मारला जाते हे इनामदार या नाटकातून मांडले आहे. ग.ल.ठोकळांनी कशासाठी? पोटासाठी! हे इ.स.१९६० ला नाटक लिहिले. यातून त्यांनी प्रत्येक माणूस हा पोटासाठी राबत असतो. याचे चित्रण वेगवेगळ्या पातळीवर केले आहे. ग्रामीण भागातील देशमुख हा मुंबईमध्ये जाऊन खूप इस्टेट मिळवितो आणि ती त्याच्या शेवंता या मुलीला मिळावी असे मृत्युपत्रात लिहितो. कारण साहेब हा यांचा सांभाळलेला मुलगा असतो. मात्र शेवंता हयात नसेल तर ती इस्टेट या साहेबरावलाच मिळणार असते. या पार्श्वभूमीवर देशमुखाचे वकील शामराव इस्टेट मिळविण्यासाठी अनेक परीने प्रयत्न करतात. खोटी शेवंता उभी करतात. पण याचा उपयोग होत नाही. ही सर्व धडपड तो इस्टेट मिळविण्यासाठी करताना दिसतो. माणूस कशासाठी? तर तो पोटासाठी धडपडतो हेच येथे सांगितले आहे. व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण भागातील कुंभाराचे पारंपरिक जीवन तू वेडा कुंभारड या नाटकातून मांडले आहे. भोजा हा आधुनिकतेच्या मागे लागतो. यातून ग्रामीण संस्कृती लयाला जात आहे. याची जाणीव इजाप्पाला होते. पण भोजाला ते समजत नाही. यातूनच इजाप्पाच्या जीवनाची झालेली होरपळ परिणामकारक पध्दतीने लेखक मांडतो.

रा.रं.बोराडे यांनी पिकलं पान या नाटकातून ग्रामीण भागात बाई ठेवणे हा प्रकार कसा रूढ आहे हे मांडले आहे.मात्र शिक्षण घेतलेला मानाजीचा मुलगा तानाजी हा बाई ठेवण्यास विरोध करतो. यातून आपल्या घराण्याची इज्जत जाणार आणि आपली गावात किंमत कमी होणार असे मानून मानाजी वयस्कर असूनही तो बाई ठेवतो. असा हा बाहय रखेलीपणचा भाग पाटिलकी मिरविण्यासाठी करताना दिसतो.

वरील ग्रामीण नाटकाच्या लेखकांशिवाय इतरही अनेक ग्रामीण नाटककरांनी नाटके लिहिलेली आहेत. जसे की के.डी.पाटील (फकिरा, शिवा रामोशी, सोन्याची लंका), कमलाकर बोरकर (डाकू मानसिंग, जन्मदाता, ठिणगी), मो.ग.शिवळकर (पोटचा गोळा), कृ.गो.सुर्यवंशी (न मळलेली वाट), व्यंकटेश वकील (भिमीची सवत),बाबूराव काळे (दत्तक), जगदीश खेबूडकर (सोळाव वरीस धोक्याचं), गणेश हिर्लेकर (कर्दनकाळ, रक्ताचा टिळा, भाग्याच कुंकु इत्यादी) अशी अनेक ग्रामीण नाटके लिहिली आहेत. वरील ग्रामीण नाटकाच्या विकासाचा विचार करता



Scanned by CamScanner

महात्मा फुलेंच्या तृतीयरत्न पासून ग्रामीण नाटकाची परंपरा सुरु झालेली दिसते आणि ती आजतागायत सुरु आहे. मात्र या वाङ्मय प्रकाराचा समीक्षेच्या क्षेत्रात विचार केला जात नाही. त्यामुळे ग्रामीण नाटक म्हणून त्यांचा अभ्यास केला जात नाही. वरील लेखकांशिवाय इतरही कांही लेखकांनी ग्रामीण नाटकांचे लेखन केलेले असेत. सर्वच नाटकाचा येथे परामर्श घेता येणे शक्य नाही. मात्र ग्रामीण नाटक हा वाङ्मय प्रकार ग्रामीण कथा, कादंबरी व कविता यांच्या तुलनेने मर्यादित रुपाने विकास पावलेला असला तरीतो ग्रामीण साहित्यात महत्त्वाचा आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्याचा विस्तार अधिक वाढतो. जे विषय समाज जागृतीसाठी महत्त्वाचे आहेत ते विषय ग्रामीण नाटकातून अनेक लेखकांनी मांडले आहेत. त्यामुळे ग्रामीण कथा, ग्रामीण कादंबरी, ग्रामीण कविता या वाङ्मयाबरोबरच आज ग्रामीण नाटकांचा अभ्यासक्रमामध्ये अभ्यास होणे क्रमप्राप्त आहे.

### संदर्भ ग्रंथ


१) तर्क तीर्थ श्री जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा):मराठी विश्वकोश खंड ८ महाराष्ट्र साहित्य संस्कृत मंडळ, मुंबई १९७९,पृ. ४५१.

२) तर्क तीर्थ श्री जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा):मराठी विश्वकोश खंड ८ तत्रैव पृ.४५१.

३) दाते यशवंत रामकृष्ण व कर्वे चितांमण गणेश (संपा) : महाराष्ट्र शब्दकोश, प्रकाशन ह.अ.भावे वरदा बुक्स ३९७/१, सेनापती बापट मार्ग, पुणे १६, पृ. १८१९.

४) भट गो.के : संस्कृत नाटयसृष्टी, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९७८, पृ.१६८.

५) तर्क तीर्थ श्री जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा):मराठी विश्वकोश खंड ८ उनि. पृ.४५१.

६) शिंदे कष्णाजी : नाटकशास्त्र आणि तंत्र, पृ.४७.

७) बापट गोपाळ वामन : नाटयविषयक व्यापक विचार, पृ.४७.

८) फडके ना.सी. : प्रतिभा साधना, प्रकाशन-देशमुख आणि कंपनी प्रा.लि. पंधरावे पुनर्मुद्रण १९९३,सदाशिव पेठ,पुणे,पृ.१५२.

९) मेदरकर प्रकाश : सामाजिक नाटक : स्वरूप विचार प्रकाशन अरुण गं.कुलकर्णी, साहित्य सेवा प्रकाशन, पारगांवकर निवास औरंगापूर, औरंगाबाद, पृ.५७.

१०) भगत दत्ता (संपा) : तृतीयरत्न प्रकाशन-सुमती लांडे शब्दालय प्रकाशन, वार्ड ७, श्रीरामपूर ४१३७०१, पहिली आवृत्ती २८ नोव्हेंबर २००१ पृ.११.

११) पावडे सतीश (संपा) : तृतीय रत्न महात्मा ज्योतीराव फुले कृत. प्रकाशन-मिलिंद डहाके नभ प्रकाशन श्यामनगर, कॉंग्रेस नगर रोड, अमरावती, प्रथमावृत्ती २८ नोव्हेंबर २००७, प्रस्तावना.

१२) कुलकर्णी मदन : तृतीय रत्न, महात्मा फुलेकृत प्रकाशन सचिन उपाध्यक्ष, विजय प्रकाशन, हनुमान गल्ली,सीताबर्डी, नागपूर ४४००१२. प्रथमावृत्ती ११ एप्रिल २००७, पृ.१८.




Scanned by CamScanner